श्री. सुर्यकांत रामचंद्र बांदेकर वि.

श्री. प्रदिपकुमार तुकाराम बांदेकर

## निशाणी क्रमांक ६२ वरील आदेश

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.१ ते ७ यांनी त्यांच्याविरूध्द पारीत झालेला 'म्हणणे नाही' आदेश रद्द होवून मिळावा अशी विनंती केलेली आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांच्या मते, त्यांना दाव्याच्या समन्सची बजावणी झालेनंतर ते प्रस्तुत कामी हजर झाले. मध्यंतरीच्या कालखंडात प्रतिवादी क्र.१ ते ७ हे मुंबई येथे वास्तव्यास असल्याने त्यांना आपल्या वकीलांना भेटून आवश्यक ती माहिती व कागदपत्रे देणे शक्य झाले नाही. त्यामुळे त्यांना तुर्तातुर्त ताकीद अर्जावर म्हणणे देता आले नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द 'म्हणणे नाही' आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांचा म्हणणे दाखल करण्यामागे कोणताही निष्काळजीपणा नव्हता. प्रतिवादी यांचे विरूध्द झालेला 'विना म्हणणे' आदेश रद्द न झालेस त्यांचे पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे अपरिमित नुकसान होणारे आहे आणि त्यांना न्यायाला मुकावे लागणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ७ यांनी त्यांच्याविरूध्द झालेला 'विना म्हणणे' आदेश रद्द होवून मिळावा अशी विनंती केलेली आहे.

३. वादी यांनी नि.७० कडे आपले म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप घेतला आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ७ यांनी सुरुतीपासून विलंबाचे धोरण अवलंबीले आहे. वादी यांनी दाखल केलेला तुर्तातुर्त अर्जास विलंब व्हावा या हेतूने वेळेत म्हणणे दिलेले नाही. प्रतिवादी यांना वारंवार संधी देण्यात आलेली आहे. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांचेकडे एकत्रीतपणे अखत्यारपत्र असून देखील प्रस्तुत कामी वेळेत हजर झालेले नाहीत. अर्जात योग्य व संयुक्तीक कारण दिलेले नाही. सबब अर्ज नामंजूर करणेची विनंती केलेली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने हक्कप्रस्थापना ठराव व कायमची ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे व रोजनाम्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ ते ७ हे

दि.२५/०६/२०२४ रोजी सदर कामात हजर झाले आहेत. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी दि.२५/११/२०२४ रोजी दिलेला आहे. यावरून असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ ते ७ यांना म्हणणे देण्यास विलंब झालेला आहे. परंतु प्रस्तुत अर्जावर वादीचे म्हणणे अभिलेखावर आलेस नि.५ वरील अर्ज गुणदोषावर चालून निकाली होणेस मदत होणार आहे. त्यामुळे त्यांना संधी दिलेस न्यायोचित होईल. परंतु प्रतिवादींनी नि.५ वरील अर्जावर म्हणणे दाखल करणेस केलेला विलंब पाहता व त्या अनुषंगाने वादीची झालेली गैरसोय पाहता ती योग्य तो खर्च आकारुन भरुन काढणे गरजेचे आहे. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ आपले प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जातील प्रतिवादींचे कथन विचारात घेण्यास कोणतीही हरकत दिसून येत नाही. सबब, मी खालील आदेश पारित करत आहे.

**–:: आदेश ::–**

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रूपये २००/–(रु.दोनशे मात्र) इतका खर्च आकारुन मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते ७ यांनी खर्चाची रक्कम अदा केलेनंतर त्यांचेविरूध्द पारीत झालेला 'म्हणणे नाही' आदेश रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी खर्चाची रक्कम पुढील तारखेस वा तत्पूर्वी वादीस देणेची आहे.

४. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेस देण्यास कसूर केल्यास प्रस्तुतचा आदेश आपोआप रद्द होईल.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.07.10 12:01:37 +0530

दिनांक– ०८/०७/२०२५ (श्रीमती आर.जी.कुंभार)

ठिकाण– सावंतवाडी. सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

सावंतवाडी.